# आदिवासी विकास आयुक्तालय,
## महाराष्ट्र राज्य, नाशिक

आदिवासी विकास भवन,पहिला मजला, गडकरी चौक, जुना मुंबई-आग्रा रोड, नाशिक -४२२००२
दुरध्वनी क्रमांक (०२५३)२५७७५१० २५७४२३५, २५७५६१५, २३१७९३८, फॅक्स -२५७९२०८
E-mail- ctdnsk@yahoo.com Website:- www.mahatribal.gov.in

---

**अत्यंत महत्वाचे** क्र.न्युबयो-२०११/प्र.क्र.१६१(११)/का.३(२)
दि. १६ ऑगस्ट २०११

प्रति

अपर आयुक्त,
आदिवासी विकास,
नाशिक.

**विषय :- केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत (न्युक्लिअस बजेट) सन २०११-१२ मध्ये राबवावयाच्या योजनांचा प्रारुप आराखडा मंजुरीबाबत...**

संदर्भ :- १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.न्युबयो-२०००/ प्र.क्र.१४४(अ)/का.५ दि.३१.०५.२००१
२) आयुक्तालयाचे पत्र क्र.न्युबयो-२०१०/प्र.क्र.३८(१०)/का.३(२) दि.२० मे २०१०
३) आपले पत्र क्र.न्युबयो-२०१०/प्र.क्र.६४/का.२(१)/२९६७ दि.१४.०६.२०११.

उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये आपण सादर केलेला प्रारुप आराखडयाचे अवलोकन केले असता गत ३ वर्षात राबविलेल्या अनेक योजनांची पुनरावृत्ती होत असल्याचे दिसून येते. वास्तविक मार्गदर्शक सुचनांनुसार अशा योजना नियमित योजनेत समाविष्ट करणे क्रमप्राप्त आहे. मात्र त्या अनुषंगाने कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. या योजनांची एकंदरीत उपयुक्तता विचारात घेवून आगामी १२ व्या पंचवार्षिक योजनेत सदर योजना समाविष्ट करण्यासाठी **पुरेशा समर्थनासह** प्रस्ताव सादरीकरणाची कार्यवाही व्हावी.

तुर्तास न्युक्लिअस बजेट आराखडा सन २०११-१२ मध्ये खालीलप्रमाणे योजनांची वर्गवारी करणे उपयुक्त राहील.

अ गट :-

१) सदर गटांतर्गत घ्यावयाच्या उत्पन्नवाढीच्या योजनांच्या अनुषंगाने प्रकल्प क्षेत्रात कोणकोणत्या व्यवसायास वाव आहे अशा व्यवसायांची तालुकानिहाय सुची तयार करणे.

२) काही व्यवसाय हे क्लस्टर बेस्ड असू शकतात त्यामुळे अशी क्लस्टर देखील निश्चित करणे.

३) तसेच आदिवासी क्षेत्रातील तालुका रस्ते, जिल्हा रस्ते, राज्य मार्ग, राष्ट्रीय महामार्गालगत हॉटेल, पान शॉप, फळे, वर्कशॉप, इ. रस्त्यालगत चालणारे सेवा क्षेत्रातील व्यवसायांची तालुका निहाय स्थाननिश्चिती सुची तयार करणे.

४) हॉटेल, पानशॉप, किरकोळ किराणा, सायकल दुरुस्ती, इ. व्यवसाय एकत्र करुन एकच व्यवसाय वरील सुचीतील ठिकाणी करणेबाबत कार्यवाही करणे.

५) कुशल (प्रशिक्षीत) बेरोजगारांना व्यवसायासाठी सहाय्य करणे करीता उमेदवाराने घेतलेल्या प्रशिक्षणानुसार करावयाच्या व्यवसायांची सुची तयार करणे.

ब गट :- सदर गटात घेण्यात येणा-या प्रशिक्षणांची खालीलप्रमाणे विगतवारी करावी.

१) उच्च शिक्षणासाठी होणा-या **प्रवेशपरीक्षा पुर्व तयारी प्रशिक्षण.**

i) वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेशपरीक्षा (MHT CET)

ii) बी.एड प्रवेश परीक्षा

iii) एम.बी.ए व तत्सम पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा (CAT, GATE इ.)

iv) परदेशात उच्चशिक्षणासाठी प्रवेश परीक्षा TOFEL, GRE

v) नेट / सेट प्रवेश परीक्षा

**२) मान्यताप्राप्त संस्था व मान्यताप्राप्त संगणकीय अभ्यासक्रम प्रशिक्षण.**

i) MS-CIT, CCC, टंकलेखन, शॉर्टहॅन्ड इ. सेवाभरती नियमातील अर्हतेची पुर्तता करणारे प्रशिक्षण

ii) पदविका अभ्यासक्रम

iii) प्रमाणपत्र अभ्यासक्रम

३) व्यवसाय करु इच्छिणा-या **अकुशल, मजुर, १० वी व १२ वी नापास उमेदवार, अर्धवट शिक्षण सोडलेले उमेदवारांना प्रशिक्षण, इ. .** (अशा नियोजित / अपेक्षित प्रशिक्षण विषयांची सुची तयार करावी.)

४) नोकर भरती स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण.

i) MPSC

ii) UPSC

iii) स्टाफ सिलेक्शन कमिशन

iv) बँकिंग सर्व्हिस रिक्रुटमेंट

v) रेल्वे रिक्रुटमेंट

**क व ड गट पुर्वीप्रमाणेच वर्गवारी अपेक्षित आहे.**

वरीलप्रमाणे वर्गवारी विचारात घेवून आपण सादर केलेल्या आराखडयातील योजना मान्य / अमान्य केल्या असून या पत्रासोबतच्या विवरणात दर्शविल्या आहेत. तरी सदर योजना अंमलबजावणी उक्त वर्गवारीनुसार करावी. सदर अंमलबजावणी करतांना खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१) प्रारुप आराखडयातील गटनिहाय मान्य योजनांना निर्देशन समितीची तात्काळ मंजुरी घ्यावी. योजना मंजुर करतांना त्या स्थानिक गरजेवर आधारित आहेत, प्रशिक्षण योजना मान्यताप्राप्त अभ्यासक्रमानुसार मान्यताप्राप्त संस्थेमार्फत राबविणे प्रस्तावित आहे, प्रस्तुत

योजना लाभार्थींच्या जीवनमान उंचाविण्यास उपयुक्त आहे इ. व या अनुषंगिक बाबींची पुर्तता होत असल्याची खात्री करावी. मंजुर योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

- ज्या योजना अमान्य केलेल्या आहेत त्या योजनेचा निधी ज्या यशस्वी योजना आहे, ज्या योजनांची गरज आहे, ज्या योजनांची फलनिष्पत्ती चांगली आहे अशा योजनांना **लक्षांक वाढवून उर्वरित निधी खर्च करावा.**

२) मान्य योजनांना पुरेशा प्रमाणात कार्यक्षेत्रातील सर्व तालुक्यात प्रसिध्दी देण्यात यावी.

३) तालुकानिहाय आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात मान्य योजनांचा लक्षांक निश्चित करावा व सर्व तालुक्यातील लाभार्थींना लाभ देण्यात यावा.

४) मंजुर योजना क्लस्टर पध्दतीने राबवावी जेणेकरुन विशेष परिणाम दिसून येईल व योजनेचे मुल्यमापन करणे सुलभ होईल.

५) काही प्रकल्प कार्यालयांकडून प्रारुप आराखडयात योजना प्रस्तावित करतांना एकच योजना / बाब वेगवेगळया संस्थांमार्फत राबविण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, या पत्राव्दारे आपल्या आराखडयातील **फक्त योजनेस / बाबीस** मंजुरी देण्यात येत आहे. संस्था अथवा लाभार्थीस मंजुरी दिलेली नाही. संस्था व लाभार्थी निवडीची प्रक्रिया आयुक्तालय परिपत्रक दि.१२ ऑक्टोबर २०१० मधील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे करावी.

६) प्रत्येक योजना मंजुरीच्या अनुषंगाने निर्देश समितीचे इतिवृत्त / कार्यवृत्त रजिस्टर अद्ययावत ठेवणे बंधनकारक आहे.

७) न्युक्लिअस बजेट अंतर्गत शासनाकडून मान्य / निश्चित केलेल्या योजना (उदा. वाहन चालक प्रशिक्षण) प्रारुप आराखडयात समाविष्ट नसल्यातरी राबविणे आवश्यक आहे.

८) न्युक्लिअस बजेट K.R.A. अंतर्गत समाविष्ट असल्याने सर्व योजनांची माहिती तात्काळ उपलब्ध होण्याचे दृष्टीकोनातून आयुक्तालयाकडून विहीत केलेल्या नमुन्यात खर्चाची व योजनांची माहिती संगणकीकृत करण्यात येवून अद्ययावत ठेवण्यात यावी. दरमहा १० टक्के / कॅशफ्लो इतका खर्च करण्याचे नियोजन करावे.

९) प्रकल्प कार्यालयांनी संस्था निवड ही विहीत पध्दतीचा अवलंब करुनच करावी तसेच योजनेंतर्गत करावयाची साहित्य खरेदी महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा, कामगार विभागाच्या शासन निर्णय दि.०२.०१.१९९२ व दि.३०.०३.१९९४ मधील अटी शर्तीनुसार, आकस्मिक खर्च नियमावली, शासन निर्णय दि.०२ जानेवारी १९९२, आदिवासी विकास विभाग परिपत्रक दि.२४ सप्टेंबर २०१० तसेच वित्तीय नियमावलीचा अवलंब करुन व शासन दरकरारानुसार करण्यात यावी. सदर बाबत कोणतीही तक्रार उद्‌भवणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

१०) योजनांना मंजुरी मिळाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांची यादी प्रकल्प कार्यालयाचे नोटीस बोर्डावर व इतर ठिकाणी प्रसिध्द करण्यात यावी. लाभार्थी व्दिरुक्ती होणार नाही याबाबत खात्री करावी.

११) **योजना राबवितांना / मंजुरी देतांना उपलब्ध निधीच्या मर्यादेतच योजना मंजुर करण्याची तसेच योजना त्याच आर्थिक वर्षात पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी.**

१२) न्युक्लिअस बजेट अंतर्गत राबविलेल्या योजनांचे मुल्यमापन करणेबाबत संदर्भ क्र. १ चे शासन निर्णयात नमुद केले आहे. त्यानुसार प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त यांनी राबविलेल्या योजनांचे मुल्यमापन करणे अत्यावश्यक आहे. तसेच ज्या योजनांना शासनाने अथवा आयुक्तालयाने मान्यता दिलेली आहे अशा योजनांचा मुल्यमापन अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी. सर्व योजनांचे मुल्यमापन करण्याची जबाबदारी प्रकल्प अधिकारी व अपर आयुक्त कार्यालयाचीच राहील.

१३) विहीत नमुन्यात **गटनिहाय त्रैमासिक खर्च अहवाल** व त्यासोबत **लाभार्थ्यांची यादी** PDF फॉरमेट मध्ये ई मेल व्दारे सादर करावी. सदर यादी आयुक्तालयाचे वेबसाईटवर प्रसिध्द करावयाची असल्याने बिनचूक यादी सादर करण्याची दक्षता घ्यावी.

१४) मंजुर योजना राबविल्यानंतर ती प्रस्तावित केल्यापासून तर यशस्वीपणे राबवून त्यांचे मुल्यमापन केल्याची स्थिती दर्शविण्याइतपत प्रकल्प अहवाल तयार करुन आपले स्तरावर ठेवावा.

१५) सदर योजनांच्या एकुण लाभार्थ्यांपैकी कमाल ३ टक्के अपंग व ३३ टक्के महिला असतील याची दक्षता घ्यावी.

सोबत : योजना मान्य /अमान्य बाबतचे विवरणपत्र

स्थळप्रतीवर मा.आयुक्तांची स्वाक्षरी आहे.

स्वाक्षरीत/-
आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करीता

प्रत माहितीस्तव सविनय सादर :

मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई ३२.

प्रत :- प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक / कळवण / तळोदा / नंदुरबार / राजूर / यावल.

## प्रारुप आराखडयात समाविष्ट करण्यास मान्यता दिलेल्या व अमान्य केलेल्या योजनांबाबत विवरणपत्र

### १) प्रकल्प कार्यालय, नाशिक - गट अ-उत्पन्न निर्मीतीच्या किंवा वाढीच्या योजना.

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | शेरा / सुचना |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी शेतक-यांना तळयासाठी अस्तरी करणास ८५ टक्के अनुदान प्लास्टिक शिटच्या पुरवठा करणे. | मान्य | |
| २ | आदिवासी युवतींना स्वयंरोजगारासाठी ब्युटीपार्लरचे प्रशिक्षण देवून साहित्य देणे. | मान्य | |
| ३ | आदिवासी भागातील शेतक-यांना वेलवर्गीय भाजीपाला क्षेत्र विस्तार प्रात्यक्षिकासाठी अर्थसहाय्य देणे (कारले-भोपळे) | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १ मध्ये नमुद केल्यानुसार सुधारणा करुन राबवावी. |
| ४ | आदिवासी भागातील शेतक-यांना ८५ टक्के अनुदानावर बैलगाडी पुरवठा करणे | मान्य | |
| ५ | आदिवासींना ८५ टक्के अनुदानावर किराणा दुकान टाकणेसाठी अर्थसहाय्य करणे | अमान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. २ मधील सुचनेप्रमाणे. |
| ६ | आदिवासी युवकांना ८५ टक्के अनुदानावर लाऊडस्पीकर व मंडप साहित्य पुरवठा करणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र.१५ ची सुचनेप्रमाणे. |
| ७ | आदिवासींना ८५ टक्के अनुदानावर ताडपत्री पुरवठा करणे | मान्य | |
| ८ | आदिवासी युवकांना सायकल दुरुस्ती दुकानास ८५ टक्के अनुदान देणे | अमान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. २ मधील सुचनेप्रमाणे. |
| ९ | आदिवासी लाभार्थ्यांना हॉटेल व्यवसायासाठी ८५ टक्के अनुदान देणे | अमान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. २ मधील सुचनेप्रमाणे. |
| १० | इलेक्ट्रिशियन / वायरमन कोर्स पुर्ण केलेल्या आदिवासी उमेदवारांना स्वयंरोजगारासाठी ८५ टक्के अर्थसहाय्य देणे. | मान्य | |
| ११ | आदिवासींना स्वयंरोजगारासाठी ८५ टक्के अनुदानावर मिरची कांडप यंत्र पुरवठा करणे | अमान्य | |
| १२ | आदिवासींना व्यवसायासाठी थर्मास बॉक्स (शितपेटी) व सायकल ८५ टक्के अनुदानावर पुरवठा करणे | अमान्य | |
| १३ | आदिवासी प्रशिक्षीत युवतींना पिको फॉल एम्ब्रायडरी मशीनसह टेलरींग व कटींग व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे. | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ४ मधील सुचनेप्रमाणे. |
| १४ | आदिवासी शेतक-यांना ८५ टक्के अनुदानावर भाजीपाला क्रेट्स पुरविणे | मान्य | |
| १५ | आदिवासी शेतक-यांना पीक फवारणीसाठी नॅपसॅक पंप पुरवठा करणे. | मान्य | स्वाभिमान व वनकायद्यातील जमीनधारकांसाठी. |
| १६ | आदिवासींना मिनीआटा चक्की ८५ टक्के | मान्य | विवरणपत्रातील भाग अ |

| | | | |
|---|---|---|---|
| | अनुदानावर पुरवठा करणे. | | मधील क्र. ३ मधील सुचनेप्रमाणे. |
| १७ | पारधी समाजाच्या पुरुषांना / महिलांना द्रोण व पत्रावळी तयार करण्याचे प्रशिक्षण देवून व्यवसायासाठी मशीन पुरविणे | मान्य | |
| १८ | गवंडी कामाचे प्रशिक्षण देणे व साहित्य पुरवठा करणे | मान्य | (टेप, लेव्हल बॉटल, थप्पी, वळंबा इ. सह) |
| १९ | विविध प्रकारचे उद्योगासाठी ८५ टक्के अनुदानावर अर्थसहाय्य देणे. | अमान्य | कोणत्या उद्योगासाठी ते नमुद नाही. |
| २० | शिलाई कामाचे प्रशिक्षण देवून शिलाई मशीन पुरवठा करणे | मान्य | ITI व आश्रमशाळा संलग्न VTC मधून शिलाई प्रशिक्षण प्रशिक्षण पुर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांनाच. |
| २१ | फळे व भाजीपाला दुकानासाठी ८५ टक्के अनुदान देणे. | अमान्य | |
| २२ | चिकन मटन दुकान ८५ टक्के अनुदान देणे. | अमान्य | |
| २३ | संच साहित्य ८५ टक्के अनुदानावर पुरवठा | अमान्य | |
| २४ | मंडळ साहित्य ८५ टक्के अनुदानावर पुरवठा | अमान्य | क गटात भजनी मंडळ मान्य. |

**प्रकल्प कार्यालय, नाशिक - गट ब-प्रशिक्षणाच्या योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी उमेदवारांना विविध परीक्षांसाठी स्पर्धा पुर्व प्रशिक्षणे देणे. | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ५ मधील सुचनेप्रमाणे |
| २ | आदिवासी युवक / युवतींना वैद्यकीय / अभियांत्रिकी (सी.ई.टी) सेवा पुर्व प्रशिक्षण देणे. | मान्य | |
| ३ | आदिवासी युवकांना हलके वाहन चालकाचे प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १० मधील सुचनेप्रमाणे. |
| ४ | आदिवासी युवकांना अवजड वाहन चालकाचे प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ५ | आदिवासी युवक / युवतींना वाहकाचे (कंडक्टर) प्रशिक्षण देणे. | मान्य | |
| ६ | आदिवासी विद्यार्थ्यांना टंकलेखनाचे पशिक्षण देणे | मान्य | |
| ७ | आदिवासी युवक / युवतींना संगणक हार्डवेअर दुरुस्ती प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |
| ८ | आदिवासी युवक व युवतीनां एम.एस.सी.आय.टी प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ९ | आदिवासी युवक युवतींना डी.टी.पी संगणक प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |
| १० | आदिवासी युवकांना सर्टिफिकेट इन फायर ॲन्ड सेफ्टीबाबतचे प्रशिक्षण देणे | अमान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ९ मधील सुचनेप्रमाणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | आदिवासी युवक व युवतीनां मोबाईल फोन दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| १२ | आदिवासी युवक / युवतींना सुरक्षा रक्षक प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. २३ मधील सुचनेप्रमाणे. |
| १३ | आदिवासी युवक व युवतींना घरगुती विद्युत उपकरणे दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे व साहित्य /टुल किट देणे | अमान्य | |
| १४ | आदिवासी युवकांना बिल्डींग मेंटेनन्स (प्लास्टर, पेंटींग, प्लंबींग, वॉटर प्रुफिंग) चे प्रशिक्षण देणे | अमान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ११ मधील सुचनेप्रमाणे. |
| १५ | आदिवासी तरुणांना तेलपंप दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| १६ | आदिवासी तरुणांना बिल्डींग सुपरवायजरचे प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| १७ | आदिवासी महिला बचत गटांना पेपर डिश तयार करण्याचे प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| १८ | आदिवासी युवतींना ब्युटीपार्लर प्रशिक्षण देणे | अमान्य | अ गटात मान्य. |
| १९ | बेकरीचे पदार्थ तयार करण्याचे प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| २० | आदिवासी विद्यार्थ्यांना विविध फळांवर प्रक्रिया करुन ज्युस तयार करण्याचे प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| २१ | शासकीय आश्रमशाळेतील वर्ग ४ कर्मचा-यांना गॅस संच दुरुस्तीचे प्रशिक्षण देवून किट देणे. | अमान्य | |
| २२ | आदिवासी युवतींना हॉस्पिटल असिस्टंटचे (नर्सिंग असिस्टंट) प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ८ मधील सुचनेप्रमाणे. |
| २३ | आदिवासी युवक व युवतींना हॉस्पिटल वार्ड बॉय / आया प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ८ मधील सुचनेप्रमाणे. |
| २४ | आदिवासी युवक व युवतींना कला कुसरीचे दागिने बनविण्याचे प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| २५ | आदिवासी महिलांना वस्त्र सजावट (जरदोसी एम्ब्रायडरी हॅन्डवर्क मोतीवर्क, आरीवर्क / टिकली वर्क इ.) या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| २६ | वसतिगृहातील आदिवासी युवक व युवतींना इंग्रजी संभाषण कौशल्य व व्यक्तीमत्व विकास प्रशिक्षण देणे | अमान्य | स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणात समाविष्ट करता येईल. |
| २७ | पी.आर.टी.सीच्या प्रशिक्षणार्थ्यांना वाहकाचे (कंडक्टर) प्रशिक्षण देणे. | अमान्य | वाहनचालक प्रशिक्षणात समाविष्ट करावे |
| २८ | पी.आर.टी.सीच्या प्रशिक्षणार्थ्यांना कराटे प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| २९ | आदिवासी वन औषधी तयार करणेकामी आदिवासींना प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| ३० | पारधी समाजाच्या महिलांना पापड, मिरची, मसाले, इ. गृहउद्योग करण्याचे प्रशिक्षण देणे | मान्य | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | पी.आर.टी.सी च्या प्रशिक्षणार्थ्यांना अवजड वाहन चालक प्रशिक्षण देणे | अमान्य | वाहनचालक प्रशिक्षणात समाविष्ट करावे |
| ३२ | सैन्य व पोलिस भरतीपर्व प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थ्यांना सुरक्षा रक्षक प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| ३३ | सैन्य व पोलिस भरतीपर्व प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थ्यांना वायरलेस प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ७ मधील सुचनेप्रमाणे. |
| ३४ | मधमाशी पालनाचे प्रशिक्षण देणे व किट देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १३ मधील सुचनेप्रमाणे. |
| ३५ | आदिवासी युवक / युवतींना गांडूळ खत निर्मितीचे प्रशिक्षण देणे | अमान्य | केंद्रीय योजनेत समाविष्ट असल्याने अमान्य. |
| ३६ | आदिवासी बचत गटांना आधुनिक पध्दतीने स्वयंपाक करण्याचे प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| ३७ | आदिवासी युवकांना मोटार रिवायडींग चे प्रशिक्षण देणे. | मान्य | ITI व मान्यताप्राप्त संस्थाव्दारा असल्यास. |
| ३८ | आदिवासींना द्रोण व पत्रावळी बनविण्याचे प्रशिक्षण देणे व मशीन देणे | अमान्य | |
| ३९ | आदिवासींना रोड सुपरवायझरचे प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| ४० | आदिवासींना लेदर व रेक्झिन बॅग व पर्स बनविण्याचे प्रशिक्षण देवून व्यवसायासाठी साहित्य देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १४ मधील सुचनेप्रमाणे. |
| ४१ | बचत गटांना हॅन्डमेड पेपर प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| ४२ | बांबू पासून शोभेच्या व कलाकुसरीच्या वस्तु तयार करण्याचे प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ४३ | आदिवासी युवक व युवतींना इन्व्हर्टर दुरुस्ती प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| ४४ | आदिवासी युवक व युवतींना अग्निशमनासंबंधी प्रशिक्षण देणे. | अमान्य | याच गटातील योजना क्र. १० |
| ४५ | आश्रमशाळेतील वर्ग ४ कर्मचा-यांना धान्याला किड लागु नये म्हणून धुरीकरणासंबंधी प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १२ मधील सुचनेप्रमाणे. |
| ४६ | आदिवासी युवकांना टु व्हीलर वाहन दुरुस्ती प्रशिक्षण देणे. | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ७ मधील सुचनेप्रमाणे. |
| ४७ | आदिवासी युवक / युवतींना माहिती तंत्रज्ञानासंबंधी प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| ४८ | पैठणी रेशीम कापड निर्मितीचे प्रशिक्षण आदिवासी युवक युवतींना देणे | अमान्य | |
| ४९ | आदिवासी युवक युवतींना गारमेट मेकिंग फॅशन डिझायनींगचे प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| ५० | डिजीटल फोटोग्राफी ॲन्ड फोटो मिक्सिंग प्रशिक्षण देणे. | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ७ मधील सुचनेप्रमाणे. |
| ५१ | व्हीडीओ शुटिंग व व्हीडीओ मिक्सिंग बाबत प्रशिक्षण देणे. | मान्य | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५२ | आदिवासी युवतींना ब्युटीपार्लर कोर्स प्रशिक्षण देणे | अमान्य | याच आराखडयातील योजना क्र.१८ मान्य. |
| ५३ | आदिवासी युवकांना ए.सी. ॲन्ड रेफ्रिजरेटर मॅकेनिक प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| ५४ | शेतीमाल प्रक्रिया प्रशिक्षण आदिवासी शेतक्-यांना देणे | अमान्य | |
| ५५ | आदिवासी युवकांना प्लंबिंगचे प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ११ मधील सुचनेप्रमाणे. |
| ५६ | आदिवासी विद्यार्थ्यांना टॅलीचे (संगणक) प्रशिक्षण देणे. | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |
| ५७ | आदिवासींना सर्वांगीण विकासाचे प्रशिक्षण देणे | अमान्य | |

**प्रकल्प कार्यालय, नाशिक - गट क-मानव साधन संपत्ती विकासाच्या योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी संस्कृतीचे जतन करुन तिचा प्रसार, प्रचार करुन जनजागृती मेळावे आयोजन करणे | अमान्य | |
| २ | आदिवासी भागात साहित्य संमेलन आयोजित करणे | मान्य | विवरणपत्रातील भाग ब मधील क्र. १ प्रमाणे राबवावी. |
| ३ | आदिवासी भागात नसबंदी, कु-हाडी बंदी, कुपोषण बाबत प्रसार प्रचार करणे कामी मेळावे आयोजन करणे. | अमान्य | |
| ४ | आदिवासी भागात जंगली वन औषधी नर्सरी तयार करुन आदिवासी तरुण / तरुणींना प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| ५ | आदिवासी कोकण / कोकणी कुळ परिवाराच्या वार्षिक स्नेह संमेलनाच्या मेळावा आयोजनासाठी अर्थसहाय्य देणे | अमान्य | |
| ६ | आदिवासी युवकाला लॅपटॉप देणे | अमान्य | |
| ७ | विविध योजनांचा लाभ दिलेल्या लाभार्थ्यांना याद्या संगणकीकृत व संकलित करणेकामी सॉफ्टवेअर तयार करणे / आदिवासी विकासच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संगणक प्रणाली तयार करणे. | अमान्य | |
| ८ | आदिवासी भजनी मंडळास भजणी संच पुरविणे | अमान्य | क गटामध्ये मान्य. |
| ९ | आदिवासी मुला / मुलींना शाळेत जाणे व येणेकामी सायकल पुरवठा करणे. | मान्य | शा.आ.शा. व शा. वसतिगृहाबाहेरील शालेय विद्यार्थ्यांना. |
| १० | आदिवासी गावांच्या ग्रामपंचायतींना भांडीसंच पुरविणे | मान्य | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | आदिवासी भागात आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करणे | अमान्य | |
| १२ | शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारांना निर्वाहभत्ता देणे | मान्य | |
| १३ | आदिवासी समाजाच्या उमेदवारांना जातीचे दाखले मिळवून देण्यासाठी अनुदान देणे | अमान्य | |
| १४ | आदिवासी युवकांना शासनाचे लोकराज्य मासिक पुरविणे | अमान्य | |
| १५ | आदिवासी नृत्य पथकांना साहित्य घेणे कामी अर्थसहाय्य करणे | मान्य | |
| १६ | पारंपारिक आदिवासी लोककला प्रसार व जनजागृती करणे | अमान्य | |
| १७ | पारधी समाजाच्या पुरुषांना गवंडीकाम करण्याचे साहित्य घेणेसाठी अर्थसहाय्य करणे | मान्य | अ गटात मान्य |
| १८ | विविध प्रकारचे लहान उद्योग करणेसाठी अर्थसहाय्य देणे | अमान्य | |
| १९ | डिझेल व मोटार मॅकॅनिक आय.टी.आय प्रशिक्षण देवून व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ७ मधील सुचनेप्रमाणे. |
| २० | दारिद्रयरेषेखालील आदिवासींच्या घरावर गवती छपराऐवजी नळीचे पत्रे १०० टक्के अनुदानावर देणे | मान्य | |
| २१ | आदिवासी प्रशिक्षीत युवतींना पिको फॉल एम्ब्रायडरी मशीनसह टेलरींग व कटींग व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे | मान्य | अ गटात मान्य. |
| २२ | पारधी समाजाच्या महिलांना शिवणकामाचे प्रशिक्षण देवून त्यांना शिलाई मशीन देणे | मान्य | अ गटात मान्य. |
| २३ | वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विविध सांस्कृतिक गुण दर्शन कौशल्य कार्यक्रम आयोजन करणे | मान्य | विवरणपत्रातील भाग ब मधील क्र. २ मधील सुचनेप्रमाणे. |
| २४ | आदिवासी युवक / युवतींचे नेतृत्व शिबीराचे आयोजन करणे | अमान्य | TRTI ची नियमित योजना असल्याने अमान्य. |
| २५ | आदिवासींच्या पडीक जमीनीवर रोपवाटिका प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १७ मधील सुचनेप्रमाणे. |
| २६ | कागदी मुखवटे व नृत्याचे प्रशिक्षण | अमान्य | |
| २७ | कृषी विभागाकडून बी-बियाणे खते औषधेसाठी आर्थिक सहाय्य देणे | अमान्य | |
| २८ | १०० टक्के अनुदानावर जैविक खते पुरवठा करणे | अमान्य | |
| २९ | आदिवासी पारंपारिक नृत्ये पथकाचे साहित्य व गणेश पुरवठा करणे | अमान्य | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३० | पदवीधर / पदविका शिक्षण घेतलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना MPSC पुस्तके १०० टक्के अनुदान देणे | अमान्य | |
| ३१ | वनओषधी नर्सरी स्थापित करणे | अमान्य | |
| ३२ | आदिवासी महिला बचत गटांना मधुमक्षिकापालन उद्योग उभारण्यासाठी अर्थसहाय्य देणे | मान्य | अ गटात मान्य |
| ३३ | आदिवासी युवतींना शिवणकामाचे प्रशिक्षण देणे | अमान्य | ब गटात मान्य. |
| ३४ | आदिवासी घरांना २.५ पॉइंट विद्युत फिटींग करणे | मान्य | |
| ३५ | आदिवासींना दुध कॅनचा पुरवठा १०० टक्के अनुदानावर करणे. | अमान्य | |

**प्रकल्प कार्यालय, नाशिक - गट ड-आदिवासी कल्याणात्मक योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आगपिडीत आदिवासींना अर्थसहाय्य देणे | मान्य | |
| २ | नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यु पावलेल्या किंवा नुकसान झालेल्या आदिवासींना अर्थसहाय्य देणे | मान्य | |
| ३ | विविध नैसर्गिक आपातकालीन परिस्थितीत आदिवासींना अर्थसहाय्य देणे | मान्य | |

स्वाक्षरीत/-
आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करीता

स्थळप्रतीवर मा.आयुक्तांची
स्वाक्षरी आहे.

## २) प्रकल्प कार्यालय, कळवण - गट अ-उत्पन्न निर्मीतीच्या किंवा वाढीच्या योजना.

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आदिवासींना/महिला बचतगटांना ८५ टक्के अनुदानावर मंडप व लाऊडस्पिकर पुरवठा करणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १६ मधील सुचनेप्रमाणे. |
| २ | आदिवासी शेतक-यांना ८५ टक्के अनुदानावर लोखंडी बैलगाडीचा पुरवठा करणे | मान्य | |
| ३ | आदिवासी ग्रामपंचायतींना ८५ टक्के अनुदानावर स्वयंपाकाची भाडी पुरवठा करणे | मान्य | |
| ४ | आदिवासींना ८५ टक्के अनुदानावर घरघंटीचा पुरवठा करणे | अमान्य | |
| ५ | आदिवासींना ८५ टक्के अनुदानावर ताडपत्रीचा पुरवठा करणे | मान्य | |
| ६ | आदिवासींना ८५ टक्के अनुदानावर स्प्रिंकलरचा (तुषारसंच) साहित्य पुरवठा करणे | अमान्य | |
| ७ | आदिवासी शेतक-यांना ८५ टक्के अनुदानावर शेती औजारांचा पुरवठा करणे | अमान्य | |
| ८ | आदिवासी केसकर्तन कारागीरांना व्यवसायासाठी ८५ टक्के अनुदानावर अर्थसहाय्य करणे | मान्य | |
| ९ | ८५ टक्के अनुदानावर आदिवासी गवंडी / सुतार काम करणा-या कारागीरांना व्यवसायाची हत्यारे घेण्यासाठी अर्थसहाय्य करणे. | मान्य | |
| १० | ८५ टक्के अनुदानावर मत्स्यजाळी विणकाम करणा-या आदिवासी कारागीरांना अर्थसहाय्य देणे. | मान्य | |
| ११ | आदिवासी महिला बचत गटांना व आदिवासी सहकारी संस्थांना ८५ टक्के अनुदानावर द्रोण पत्रावळी बनविण्याचे हायड्रोलिक मशीनचा पुरवठा करणे | मान्य | |
| १२ | प्रेक्षणीय / धार्मिक स्थळांच्या ठिकाणी व्यवसाय करणा-या आदिवासी महिला / पुरुष यांना ८५ टक्के अनुदानावर अर्थसहाय्य देणे | मान्य | व्यवसाय कोणता. |
| १३ | धरणांजवळ वास्तव्यास असणा-या मच्छिमार व्यवसाय करणा-या आदिवासी लाभार्थ्यांना मत्स्यविक्री (हॉटेल व्यवसायासाठी) अर्थसहाय्य करणे. | मान्य | |
| १४ | आदिवासींना ८५ टक्के अनुदानावर प्लॅस्टिक कॅरेटचा पुरवठा करणे | मान्य | |
| १५ | आयटीआयमध्ये शिवणकाम प्रशिक्षण घेतलेल्या आदिवासी मुलींना ८५ टक्के अनुदानावर शिवणयंत्र पुरवठा करणे | मान्य | ITI व आश्रमशाळा संलग्न VTC मध्ये शिलाई प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थीनाच. |
| १६ | आदिवासी शेतक-यांना ८५ टक्के अनुदानावर सामुहिक शेततळयासाठी प्लॅस्टिक शीटच्या अस्तरीकरणासाठी अर्थसहाय्य पुरविणे. | मान्य | |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | आदिवासी महिला बचत गटांना मधुमक्षीपालन उद्योग उभारण्यासाठी अर्थसहाय्य पुरविणे | मान्य | |
| १८ | आदिवासी शेतक-यांना ८५ टक्के अनुदानावर ठिबक सिंचन संचालसाठी अर्थसहाय्य देणे. | मान्य | |

**<u>प्रकल्प कार्यालय, कळवण - गट ब-प्रशिक्षणाच्या योजना.</u>**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी युवकांना हलके वाहन चालक प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १० मधील सुचनेप्रमाणे. |
| २ | आदिवासी युवकांना अवजड वाहन चालक प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ३ | आदिवासी युवक युवतींना वाहन (कंडक्टर) पदाचे प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ४ | बेरोजगार आदिवासी युवकांना बेसिक आर्क वेल्डींगचे प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ७ मधील सुचनेप्रमाणे. |
| ५ | बेरोजगार आदिवासी युवकांना बेसिक इलेक्ट्रिकल प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ६ | बेरोजगार आदिवासी युवकांना बेसिक इलेक्ट्रॉनिक्स प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ७ | बेरोजगार आदिवासी युवतींनां गारमेंट मेकींग प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ८ | आदिवासी विद्यार्थ्यांना घरगुती इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रिक दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| ९ | आदिवासी युवक युवतींना लघुलेखनाचे (शॉर्टहन्ड) प्रशिक्षण देणे | मान्य | |
| १० | आदिवासी युवक युवतीनां टंकलेखनाचे (टायपींग) प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ११ | आदिवासी युवक युवतींना एमएस सीआयटीचे प्रशिक्षण देणे | मान्य | |
| १२ | आदिवासी युवक युवतींना डिप्लोमा इन सॉफ्टवेअर ॲप्लीकेशन प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |
| १३ | आदिवासी विद्यार्थ्यांना वेब डिझायनींग प्रशिक्षण देणे | मान्य | |
| १४ | अदिवासी विद्यार्थ्यांना संगणक हार्डवेअर, नेटवर्किंग व मेंन्टेनन्सचे प्रशिक्षण देणे | मान्य | |
| १५ | आदिवासी विद्यार्थ्यांना टॅली प्रशिक्षण देणे | मान्य | |
| १६ | आदिवासी विद्यार्थ्यांना डी.टी.पी प्रशिक्षण देणे | मान्य | |
| १७ | आदिवासी विद्यार्थ्यांना डिप्लोमा इन टु डी ॲनिमेशन प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| १८ | आदिवासी विद्यार्थ्यां डिप्लोमा इन इमेज एडिटींगचे प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| १९ | आदिवासी युवकांना सुरक्षा रक्षकाचे प्रशिक्षण देणे. | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. २२ मधील सुचनेप्रमाणे. |

## प्रकल्प कार्यालय, कळवण - गट क-मानव साधन संपत्ती विकासाच्या योजना.

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी विद्यार्थ्यांना वैद्यकीय परीक्षा पुर्व प्रशिक्षण देणे | मान्य | |
| २ | सांस्कृतिक मेळावा आयोजित करणे. | मान्य | विवरणपत्रातील भाग ब मधील क्र. १ मधील सुचनेप्रमाणे. |
| ३ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन भत्ता देणे. | मान्य | |
| ४ | जिल्हास्तरीय व त्यापुढील नृत्यकलेत यशस्वी कामगिरी करणा-या | अमान्य | |
| ५ | | | |
| ६ | आदिवासी विद्यार्थ्यांना सायकल पुरवठा करणे | मान्य | शा.आ.शा. व शा. वसतिगृहाबाहेरील शालेय विद्यार्थ्यांना. |
| ७ | विभागीय व वरच्या स्तरावरील खेळाडूंना शुज व ट्रॅक शुज पुरविणे. | अमान्य | |

## प्रकल्प कार्यालय, कळवण - गट ड-आदिवासी कल्याणात्मक योजना.

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आगपिडीत / नैसर्गिक आपत्ती ओढवलेल्या आदिवासींना अर्थसहाय्य देणे | मान्य | |
| २ | आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरीत भिल्ल व पारधी समाजाच्या लाभार्थ्यांच्या घरांच्या गवती / कौलारु छतावर टाकण्यासाठी प्लॅस्टिक ताडपत्रीचा पुरवठा करणे | मान्य | |

स्वाक्षरीत/-
आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करीता

स्थळप्रतीवर मा.आयुक्तांची
स्वाक्षरी आहे.

## ३) प्रकल्प कार्यालय, तळोदा - गट अ-उत्पन्न निर्मीतीच्या किंवा वाढीच्या योजना.

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | १५ टक्के सहभागाने शेती अवजारे पुरवठा करणे | अमान्य | |
| २ | १५ टक्के सहभागाने मिनीचक्की घरघंटी पुरवठा करणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ३ मधील सुचनेप्रमाणे. |
| ३ | १५ टक्के सहभागाने महिला बचत गटांना भांडी पुरवठा | मान्य | |
| ४ | १५ टक्के सहभागाने ताडपत्री पुरवठा करणे | अमान्य | क गटात |
| ५ | १५ टक्के अनुदानाने मिरची कांडप पुरवठा करणे (दोन हॉलर) | अमान्य | |
| ६ | १५ अनुदानाने महिलांना शिवण मशीन पुरवठा करणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ४ मधील सुचनेप्रमाणे. |
| ७ | १०० टक्के अनुदानाने दुधव्यवसायासाठी दुधाची प्लॉस्टिक कॅन पुरवठा करणे | अमान्य | |
| ८ | १५ टक्के सहभागाने भजनी मंडळास भजनी साहित्य पुरवठा करणे | अमान्य | क गटात |
| ९ | १५ टक्के अनुदानाने लाऊड स्पीकर मंडप पुरवठा करणे. | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १५ मधील सुचनेप्रमाणे. |
| १० | बांबुपासून विविध वस्तु प्रशिक्षणासाठी दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना अनुदान देणे | अमान्य | |
| ११ | १५ टक्के सहभागाने महिला बचत गटांसाठी ढाबा सुरु करणे. | अमान्य | |
| १२ | १०० टक्के अनुदानावर बी पी एल मधील दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना भाजीपाला व्यवसायासाठी प्लॉस्टिक किट्स (टोपली) पुरवठा करणे | मान्य | |
| १३ | १०० टक्के अनुदानावर दारिद्रयरेषेखालील लाभार्थ्यांना आदिवासी शेतक-यांना बी बियाणे /किटकनाशक पुरवठा करणे | अमान्य | |
| १४ | १०० टक्के अनुदानावर आदिवासी शेतक-यांना स्प्रेपंप साहित्य पुरवणे. | अमान्य | |

## प्रकल्प कार्यालय, तळोदा - गट ब-प्रशिक्षणाच्या योजना.

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | अदिवासी युवती / महिलांना शिवण कामाचे प्रशिक्षण देणे व शिलाई मशीनसह किट पुरवठा करणे | मान्य | ITI व आश्रमशाळा संलग्न VTC मधून प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | आदिवासी युवती / महिलांना ब्युटीपार्लर चे प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ३ | हॅन्डपंप दुरुस्ती प्रशिक्षण व टुल किटस सह | अमान्य | |
| ४ | सीसीसी संगणक प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ५ | बेकरीचे पदार्थ (खारी टोस्ट नानखटाई पाव) बनविण्याचे प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ६ | कागदी पेपर पासून व इतर विविध वस्तु बनविण्याचे प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| ७ | डीटीपी संगणक प्रशिक्षण देणे | अमान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |
| ८ | टॅली संगणक प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ९ | आदिवासी युवक युवतींना नृत्य, गायन, संगीतवाद्य प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग ब मधील क्र. १ मधील सुचनेप्रमाणे. |
| १० | वेब पेज डिझायनींग संगणक प्रशिक्षण देणे | अमान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |
| ११ | ॲनिमेशन २ डी संगणक प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| १२ | टंकलेखन मराठी प्रशिक्षण देणे | मान्य | |
| १३ | टंकलेखन इंग्रजी प्रशिक्षण देणे | मान्य | |
| १४ | कॉम्प्युटर हार्डवेअर नेटवर्कींग प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |
| १५ | B.ed CET प्रशिक्षण देणे | मान्य | |
| १६ | टु व्हीलर थ्री व्हीलर दुरुस्ती प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| १७ | टी.व्ही/डिश/डि.व्ही.डी दुरुस्ती प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| १८ | MPSC / UPSC स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ५ मधील सुचनेप्रमाणे. |
| १९ | मोबाईल दुरुस्ती प्रशिक्षण व किट्स पुरवठा करणे | अमान्य | |
| २० | महिला बचत गटांना आंब्यापासून आमसूल तयार करणे व विक्री प्रशिक्षण | मान्य | |
| २१ | घरगुती उपकरणे दुरुस्ती प्रशिक्षण (फॅन, मिक्सर, फ्रिज) | अमान्य | |
| २२ | विद्युत फिटींग व इतर इलेक्ट्रिक दुरुस्तीचे प्रशिक्षण देणे व किट्स देणे. | अमान्य | |

**<u>प्रकल्प कार्यालय, तळोदा - गट क-मानव साधन संपत्ती विकासाच्या योजना.</u>**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | १०० टक्के अनुदानाने पन्हाळी पत्रे पुरवठा करणे | मान्य | |
| २ | आय टी आय निर्वाह भत्ता | मान्य | |
| ३ | MSCIT प्रशिक्षण | मान्य | ब गटांतर्गत मान्य. |
| ४ | MHT CET प्रशिक्षण | मान्य | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | आश्रमशाळेतील मुला/मुलींसाठी व्यक्तीमत्व विकास प्रशिक्षण देणे. | अमान्य | विवरणपत्रातील भाग ब मधील क्र. २ मधील सुचनेप्रमाणे. |
| ६ | नर्सरी रोपवाटिका तयार करणे. | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १६ मधील सुचनेप्रमाणे. |
| ७ | आश्रमशाळेतील वर्ग ९ वी, १० वी, ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांचे जातीचे प्रमाणपत्र देणे. | अमान्य | |
| ८ | आदिवासी पारंपारिक होळी नृत्य पथकातील कलाकारांना अर्थसहाय्य देणे | मान्य | |

**प्रकल्प कार्यालय, तळोदा - गट ड-आदिवासी कल्याणात्मक योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | अतिवृष्टी / पुरग्रस्त / जळीत ग्रस्त कुटूंबांना अर्थसहाय्य देणे. | मान्य | |
| २ | दारिद्रय रेषेखालील कुटूंबांचे घरात २.५ इलेक्ट्रिकल विद्युतीकरण करणे. | मान्य | |

स्वाक्षरीत/-

स्थळप्रतीवर मा.आयुक्तांची स्वाक्षरी आहे.

आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करीता

## ४) प्रकल्प कार्यालय, नंदुरबार - गट अ-उत्पन्न निर्मीतीच्या किंवा वाढीच्या योजना.

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | ताडपत्री पुरविणे | मान्य | |
| २ | भाजीपाला व्यवसायासाठी अर्थसहाय्य | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १ मधील सुचनेप्रमाणे. |
| ३ | मिनीचक्की पुरविणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ३ मधील सुचनेप्रमाणे. |
| ४ | शेती अवजारे पुरविणे | अमान्य | |
| ५ | लाऊडस्पीकर व मंडप पुरविणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १५ मधील सुचनेप्रमाणे. |
| ६ | कॅरेट पुरविणे | मान्य | |
| ७ | बँड साहित्य पुरविणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १५ मधील सुचनेप्रमाणे. |
| ८ | पारधी जमातीसाठी सुकामेवासाठी अर्थसहाय्य देणे | मान्य | |
| ९ | आहार पुरविणा-या बचतगटांना भांडी पुरविणे. | मान्य | |

## प्रकल्प कार्यालय, नंदुरबार - गट ब-प्रशिक्षणाच्या योजना.

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण (युपीएससी / एमपीएससी) | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ५ मधील सुचनेप्रमाणे. |
| २ | संगणक प्रशिक्षण | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |
| ३ | टंकलेखन प्रशिक्षण | मान्य | |
| ४ | कॉम्प्युटर हार्डवेअर | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |
| ५ | शिवण काम प्रशिक्षण | | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ४ मधील सुचनेप्रमाणे. |
| ६ | टॅली प्रशिक्षण | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |
| ७ | कांडी कोळसा तयार करणे | अमान्य | तपशील द्यावा. |
| ८ | डी.टी.पी. प्रशिक्षण | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | मोबाईल रिपेंअरींग प्रशिक्षण | अमान्य | |
| १० | कॉलसेंटर | अमान्य | |
| ११ | सीसीसी कॉम्प्युटर प्रशिक्षण | मान्य | |
| १२ | हलके मोटार वाहन चालक प्रशिक्षण | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १० मधील सुचनेप्रमाणे. |
| १३ | जड मोटार वाहन चालक प्रशिक्षण | मान्य | |
| १४ | कंडक्टर प्रशिक्षण | मान्य | |
| १५ | कृषी माहिती व्यापार तंत्रज्ञान प्रशिक्षण | मान्य | |
| १६ | ज्युस / जॅम तयार करणे | अमान्य | |
| १७ | फॅशन डिझायनींग व जरी काम | अमान्य | |
| १८ | ॲनीमेशन प्रशिक्षण (आय.टी.आय) | अमान्य | |
| १९ | पर्स बनविण्याचे प्रशिक्षण | अमान्य | |
| २० | इसीजी प्रशिक्षण | अमान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ८ मधील सुचनेप्रमाणे. |
| २१ | एक्स रे प्रशिक्षण | अमान्य | |
| २२ | डेन्टल टेक्नीशियन प्रशिक्षण | अमान्य | |
| २३ | आश्रमशाळांतील अन्नधान्यास किड लागू नये याकरीता कर्मचा-यास प्रशिक्षण | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १२ मधील सुचनेप्रमाणे. |
| २४ | आश्रमशाळातील अनु.जमातीच्या बचतगटांना स्वयंपाकाचे प्रशिक्षण | अमान्य | |
| २५ | इन्व्हर्टर रिपेअरींग प्रशिक्षण | अमान्य | |
| २६ | पेपर डिश तयार करणे प्रशिक्षण | अमान्य | |
| २७ | गॅस शेगडी / प्लंबींग प्रशिक्षण | अमान्य | |

**प्रकल्प कार्यालय, नंदुरबार - गट क-मानव साधन संपत्ती विकासाच्या योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | जनजागृती मेळावे भरविणे | मान्य | विवरणपत्रातील भाग ब मधील क्र. १ मधील सुचनेप्रमाणे. |
| २ | आयटीआय निर्वाह भत्ता | मान्य | |
| ३ | मेडीकल / इंजी. भरतीपुर्व प्रशिक्षण (सीईटी) | मान्य | |
| ४ | बी.एड सी.ई.टी प्रशिक्षण | मान्य | |
| ५ | पन्हाळी पत्रे पुरविणे | मान्य | |
| ६ | डॉक्युमेंट्री फिल्मव्दारे माहिती प्रसार करणे | अमान्य | नियमित योजनेतून करावा |
| ७ | नर्सरी रोप वाटिका | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १६ मधील सुचनेप्रमाणे. |

## प्रकल्प कार्यालय, नंदुरबार - गट ड-आदिवासी कल्याणात्मक योजना.

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | नैसर्गिक आपत्तीसाठी कुटूंबांना अर्थसहाय्य देणे | मान्य | |
| २ | दुर्धर आजाराने पिडीत आदिवासी व्यक्तींनां आर्थिक मदत करणे | अमान्य | विवरणपत्रातील भाग ब मधील क्र. ३ मधील सुचनेप्रमाणे. |

स्वाक्षरीत/-
आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करीता

स्थळप्रतीवर मा.आयुक्तांची
स्वाक्षरी आहे.

## ५) **प्रकल्प कार्यालय, राजूर - गट अ-उत्पन्न निर्मीतीच्या किंवा वाढीच्या योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानावर विट भट्टीसाठी अर्थसहाय्य देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १७ मधील सुचनेप्रमाणे. |
| २ | आदिवासी शेतक-यांना ८५ टक्के अनुदानावर सिंचनासाठी स्प्रिंकलर युनिटचा पुरवठा करणे | अमान्य | |
| ३ | शिवनकामाचे प्रशिक्षण घेतलेल्या आदिवासी मुलामुलींना शिवनयंत्राचा पुरवठा करणे | मान्य | ITI व आश्रमशाळा संलग्न VTC मधून शिलाई प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना. |
| ४ | आदिवासी शेतक-यांना ८५ टक्के अनुदानावर शेती औजारे पुरवठा करणे | अमान्य | |
| ५ | आदिवासी लाभार्थ्यांना मत्स्यव्यवसायासाठी मत्स्यजाळी पुरवठा करणे | मान्य | |
| ६ | आदिवासी शेतक-यांना ताडपत्री पुरवठा करणे. | मान्य | |

## **प्रकल्प कार्यालय, राजूर - गट ब-प्रशिक्षणाच्या योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी युवकांना हलके वाहन चालक प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. १० मधील सुचनेप्रमाणे. |
| २ | आदिवासी युवकांना अवजड वाहन चालक प्रशिक्षण देणे व बॅचबिल्ला काढून देणे | मान्य | |
| ३ | आदिवासी तरुणांना वाहक-कंडक्टरचे प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ४ | एम एस सी आय टी संगणक प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ५ | टॅली संगणक प्रशिक्षण आयोजित करणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ६ मधील सुचनेप्रमाणे. |
| ६ | डिटीपी संगणक प्रशिक्षण आयोजित करणे | मान्य | |
| ७ | कॉम्प्युटर हार्डवेअर संगणक दुरुस्ती प्रशिक्षण आयोजित करणे | मान्य | |
| ८ | वेब डिझायनींग प्रशिक्षण आयोजित करणे | अमान्य | |
| ९ | डिजीटल ग्राफीक डिझायनींग प्रशिक्षण आयोजित करणे | मान्य | |
| १० | ऑफिस ऑटोमेशनचे प्रशिक्षण आयोजित करणे | अमान्य | |
| ११ | आदिवासी लाभार्थ्यांना ब्युटीपार्लर प्रशिक्षण देणे | मान्य | |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | आदिवासी लाभार्थ्यांना आधुनिक वाणिज्य व इंडस्ट्रियल क्षेत्रातील घडामोडींबद्दल प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| १३ | आदिवासी विद्यार्थ्यांना फॅशन डिझायनींगचे प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| १४ | आदिवासी विद्यार्थ्यांना कलाकुसरीचे दागिने तयार करण्याचे प्रशिक्षण देणे. | अमान्य | |

**प्रकल्प कार्यालय, राजूर - गट क-मानव साधन संपत्ती विकासाच्या योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आदिवासी मुलांना लोकराज्य मासिक पुरवणे | अमान्य | |
| २ | ग्रामपंचायतींना स्वयंपाकाची भांडी पुरवठा करणे | मान्य | |
| ३ | आदिवासी मुलामुलींना बीएड सीईटी प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ४ | आदिवासी विद्यार्थ्यांना सीईटी प्रशिक्षण देणे | मान्य | |
| ५ | आदिवासी लाभार्थ्यांना भजनी साहित्य पुरवठा करणे. | मान्य | |
| ६ | आदिवासी लाभार्थ्यांना स्प्रे पंप पुरवठा करणे | अमान्य | |
| ७ | आदिवासी लाभार्थ्यांना कांडप मशीन पुरवठा करणे. | अमान्य | |

**प्रकल्प कार्यालय, राजूर - गट ड-आदिवासी कल्याणात्मक योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आगपिडीत / आपादग्रस्त आदिवासींना अर्थसहाय्य देणे | मान्य | |
| २ | आदिवासी शेतक-यांना जमीन खचल्यामुळे नुकसानीस अर्थसहाय्य देणे | अमान्य | |

स्वाक्षरीत/-
आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करीता

स्थळप्रतीवर मा.आयुक्तांची
स्वाक्षरी आहे.

६) **प्रकल्प कार्यालय, यावल - गट अ-उत्पन्न निर्मीतीच्या किंवा वाढीच्या योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | आदिवासींना ८५ टक्के अनुदानावर किराणा दुकानासाठी अर्थसहाय्य देणे | अमान्य | |
| २ | आदिवासी शेतक-यांना ८५ टक्के अनुदानावर भाजीपाला व्यवसायासाठी अर्थसहाय्य करणे. | अमान्य | |
| ३ | आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानाने रुद्राक्ष / स्फटीक माळा पुरविणेसाठी अर्थसहाय्य. | अमान्य | |
| ४ | आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानाने सायकल मार्ट दुकानासाठी अर्थसहाय्य देणे | मान्य | रुपांतरीत करुन एकत्रित करुन. विवरणपत्र १ अनुसार. |
| ५ | आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानाने चहाटपरी व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. २ मधील सुचनेप्रमाणे. |
| ६ | आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानाने पानटपरी व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे | मान्य | |
| ७ | आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानाने केळी वेफर्स व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणे | अमान्य | |
| ८ | आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानाने सुकामेवा अर्थसहाय्य देणे. | अमान्य | |
| ९ | आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानाने बैलगाडी पुरवठा करणे. | मान्य | |
| १० | आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानाने ताडपत्री पुरवठा करणे | मान्य | |
| ११ | आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानाने हातगाडी (लोटगाडी) पुरवठा करणे | अमान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. २१ मधील सुचनेप्रमाणे. |
| १२ | आदिवासी लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानाने घरासाठी कौल / मंगलोरी कौल पुरवठा अर्थसहाय्य. | मान्य | |

**<u>प्रकल्प कार्यालय, यावल - गट ब-प्रशिक्षणाच्या योजना.</u>**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | १२ वी सायन्सच्या आदिवासी युवक युवतींना अभियांत्रिकी / वैद्यकीय प्रवेशपुर्व परीक्षा प्रशिक्षण (एम.एच.सी.ई.टी) | मान्य | |
| २ | आदिवासी इ. ५ वी ते १० वी तील आदिवासी मुला/मुलींना इंग्रजी स्पिकींग कोर्स प्रशिक्षण देणे | अमान्य | |
| ३ | आदिवासी युवक युवतींना बिल्डींग बांधकाम / रोड सुपरवायझर प्रशिक्षण देणे | अमान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ११ मधील सुचनेप्रमाणे. |
| ४ | आदिवासी युवक युवतींनां एमएससीआयटी प्रशिक्षण देणे | मान्य | |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | अनु. जमातीच्या सुशिक्षीत विद्यार्थ्यांना सुरक्षा रक्षक भरतीपुर्व प्रशिक्षण देणे | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. २२ मधील सुचनेप्रमाणे. |
| ६ | अनुसूचित जमातीच्या युवतींनां टेलरिंग एम्ब्रायडरी व्यवसायाचे प्रशिक्षण देवून यंत्र (मशीन ) पुरविणे. | मान्य | विवरणपत्रातील भाग अ मधील क्र. ४ मधील सुचनेप्रमाणे. |
| ७ | आदिवासी युवक-युवतींना जाम / जेली फळ प्रक्रिया पासून ज्युस प्रशिक्षण देणे. | अमान्य | |
| ८ | आदिवासी युवक-युवतींना मराठी / इंग्रजी टंकलेखन प्रशिक्षण देणे. | मान्य | |

**प्रकल्प कार्यालय, यावल - गट क-मानव साधन संपत्ती विकासाच्या योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | शिकाऊ उमेदवारांना अधिनियम १९६१ नुसार कारखानदारीमध्ये प्रवेशित युवकांना निर्वाह भत्ता देणे | मान्य | |
| २ | आदिवासी समाजामध्ये जनजागृती मेळावे आयोजित करण्यासाठी आर्थिक मदत करणे | मान्य | विवरणपत्रातील भाग ब मधील क्र. १ मधील सुचनेप्रमाणे. |
| ३ | आदिवासी युवक युवतींना लोकराज्य अंक पुरविणे | अमान्य | |
| ४ | आदिवासी युवक युवतींनां स्पर्धा परीक्षा / नोकरी संदर्भात मासिक अंक पुरविणे | अमान्य | |
| ५ | आदिवासींना १०० टक्के अनुदानाने सौरकंदिल पुरवठा करणे | अमान्य | |
| ६ | अनुसूचित जमातीच्या लोकांना जनश्री विमा पॉलिसी देणेबाबत. | अमान्य | |

**प्रकल्प कार्यालय, यावल - गट ड-आदिवासी कल्याणात्मक योजना.**

| अ. क्र. | तपशील | मान्य / अमान्य | सुचना |
|---|---|---|---|
| १ | नैसर्गिक आपत्ती ओढवलेल्या आदिवासीं कुटूंबांना अर्थसहाय्य देणे | मान्य | |
| २ | दुर्धर आजाराने पिडीत आदिवासी व्यक्तींना आर्थिक मदत करणे | अमान्य | विवरणपत्रातील भाग ब मधील क्र. ३ मधील सुचनेप्रमाणे. |

स्वाक्षरीत/-
आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करीता

स्थळप्रतीवर मा.आयुक्तांची
स्वाक्षरी आहे.

## विवरणपत्र

# न्युक्लिअस बजेट अंतर्गत योजना राबवितांना करावयाचे बदल व सुचनांबाबत...

## अ) उत्पन्न वाढीच्या व प्रशिक्षणाच्या योजनांबाबत (गट अ व ब) :-

१) **परसबाग लागवड :-** या योजनेंतर्गत SAM, MAM व PvTG कुटूंबांना अर्थसहाय्य, ठाणे जिल्हा (३ प्रकल्प) , नंदुरबार जिल्हा (२ प्रकल्प), गडचिरोली जिल्हा (३ प्रकल्प), नाशिक जिल्हा (२ प्रकल्प), धारणी जिल्हा (१ प्रकल्प) या जिल्हयातील/प्रकल्पातील लाभार्थ्यांना अर्थसहाय्य ही योजना राबविण्यात यावी.

२) **हॉटेल व्यवसाय, किराणा व सायकल दुरुस्ती व्यवसाय :** हे व्यवसाय एकत्र करुन योजनेत सुधारणा करण्यात यावी.

३) **मिनी चक्की / घरघंटी :-** या योजनेचा लाभ देतांना लाभार्थ्यांची व्दिरुक्ती टाळावी, एका गावात/पाडयात एकच लाभार्थ्यांस लाभ द्यावा. तसेच योजनेचे वाटपात प्रत्येक पाडयांचा / गावांचा समावेश करावा.

४) **पिको फॉल एम्ब्रायडरी मशीन व शिलाई मशीन सह प्रशिक्षण** :- या योजना वेगवेगळया न करता एकत्रित करुन प्रस्तावित कराव्यात.

५) **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन :** सदर प्रशिक्षणातुन अपेक्षीत यश मिळण्याकरिता उमेदवारांची चाळणी परीक्षा घेणे व प्रशिक्षण नामांकीत संस्था मार्फतच देणे आवश्यक आहे. त्याकरिता प्रकल्प क्षेत्रातील अथवा प्रकल्पालगतच्या नामांकीत संस्थांची सूची तयार करणे उपयुक्त राहील. अशी सूची अपर आयुक्त निहाय करणे अधिक उपयुक्त ठरु शकेल. स्थानिक परिस्थीतीनुरुप अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांनी मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करुन नामांकीत संस्थांचे प्रस्ताव मागवुन त्यांची सूची तयार करावी. व उमेदवारांना सोयीस्कर ठरेल अशा संस्थेत प्रशिक्षणासाठी पाठवावे.

६) **विविध प्रकारचे संगणक प्रशिक्षण :** या योजनेबाबत MSCIT व CCC (DOEACC) अशा मान्यताप्राप्त अभ्यासक्रम वगळता इतर कोर्सेस (उदा. संगणक हार्डवेअर, नेटवर्किंग, डी.टी.पी, टॅली, डिप्लोमा इन सॉफ्टवेअर ॲप्लीकेशन, वेब डिझायनिंग, ॲनिमेशन, इमेज एडिटिंग, सॉफ्टवेअर कोर्सेस, ऑफिस ऑटोमेशन, डिजीटल ग्राफीक डिझायनींग इ.) प्रस्ताव आल्यास कोर्सला/अभ्यासक्रमाला तांत्रिक शिक्षण मंडळाची/शासनाची मान्यता आहे काय हे तपासणे ? व प्रस्ताव सादर करणारी संस्था ITI पुरस्कृत / मान्य संस्था आहे काय? हे पडताळणे.

७) **तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम :** या प्रशिक्षणात तांत्रिक स्वरुपाचे कोर्सेस (उदा.इलेक्ट्रिशियन, वायरमन, वायरलेस, मोटार रिवायडींग, इन्व्हर्टर दुरुस्ती, डिझेल-मोटार मॅकॅनिक, बेसिक आर्क वेल्डिंग, टु-थ्री व्हीलर दुरुस्ती, घरगुती वीज उपकरणांची दुरुस्ती/ फिटींग, फोटोग्राफी व व्हिडीओ शुटिंग इ.) यांचा समावेश करता येईल. या योजनांना कोर्सला/अभ्यासक्रमाला तांत्रिक शिक्षण मंडळाची/शासनाची मान्यता आहे काय हे तपासणे ? व प्रस्ताव सादर करणारी संस्था ITI पुरस्कृत / मान्य संस्था आहे काय? हे पडताळणे.

८) **रुग्णालय/हॉस्पिटल सेवेत प्रशिक्षण :-**_या योजनेत नर्सिंग असिस्टंट, वार्ड बॉय, आया, ई.सी.जी., एक्स रे, डेन्टल टेक्नीशियन इ. प्रशिक्षणांचा समावेश होतो. यामध्ये प्रशिक्षण संस्था शासन मान्य असणे आवश्यक असून नोकरीची हमी देण्याच्या अटीवर योजना राबविण्यात यावी.

९) **अग्निशमन प्रशिक्षण :** या प्रशिक्षणाबाबत राज्यातील नामांकित संस्थांशी संलग्न होवून त्यांनी ठरविलेल्या दराबाबत अभिप्राय घेवून योजना राबविण्यात यावी.

**१०) हलके वाहनचालक/अवजड वाहन चालक/ वाहक प्रशिक्षण :** या योजनेत किती प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले? त्यासाठी झालेला खर्च ? नोकरी/स्वयंरोजगार प्राप्त झालेले प्रशिक्षणार्थ्यांची संख्या, इ. माहिती अपर आयुक्त स्तरावर संकलित करावी तसेच या योजनेच्या फलनिष्पत्तीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

**११) बिल्डींग ॲण्ड मेंटेनन्स :** सदर प्रशिक्षणास (उदा.बिल्डींग मेंटेनन्स, प्लास्टर, पेंटींग, प्लंबिंग, वॉटर प्रुफिंग, सुतार काम, बिल्डींग सुपरवायजर, रोड सुपरवायजर, ) ITI मान्य किंवा तांत्रिक शिक्षण मंडळाची मान्यता असेल तरच उपक्रम राबवावा.

**१२) धुरीकरण :** धान्याला किड लागू नये म्हणून धुरीकरण प्रशिक्षण दर निश्चितीची व सोबत किट देणेची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**१३) मधुमक्षिका पालन :** खादी ग्रामोद्योग, जिल्हा उद्योग केंद्र यांच्या मान्यताप्राप्त संस्थांच्या सहाय्याने लाभार्थीस योजनेचा लाभ द्यावा.

**१४) चर्मोद्योग वस्तु निर्मिती :** या योजनेत (उदा.लेदर-रेक्झीन बॅग, पर्स इ.) निर्माण होणा-या वस्तुंबाबत बाजारपेठेतील मागणीचे सर्वेक्षण, वस्तुला बाजारपेठ उपलब्धता, तयार होणा-या वस्तुंसाठी विक्रीव्यवस्था इ. बाबत तपासणी करुन अहवाल अभिप्रेत आहे. संस्थेने प्रशिक्षणार्थ्यांनाकडून उत्पादित माल घेवून त्यास बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करावे.

**१५) लाऊडस्पीकर / मंडप / डी.जे./बँड साहित्य पुरविणे योजना :-** ही योजना राबवितांना लाभार्थ्यांची व्दिरुक्ती टाळावी तसेच एका गावासाठी फक्त एकच लाभार्थी निवडावा. ज्या गावात लाभ यापूर्वी दिलेला आहे त्या गावांची निवड करण्यात येवू नये.

**१६) रोपवाटिका :** या योजनेसाठी यापूर्वी देखील निधी ठेवल्याचे दिसून येते. प्रस्तुत योजनेचा लाभ किती लाभार्थ्यांना मिळाला? किती क्षेत्राला? याचा संपुर्ण तपशील आवश्यक. यामध्ये फळबाग लागवड समाविष्ट करावी.

**१७) वीटभट्टी :** या योजनेसाठी संस्था नोंदणीकृत आहे काय? जागेची परवानगी आहे काय? कागदपत्रांची पुर्तता केली आहे काय? महसुल विभागाची परवानगी, जागेची परवानगी आहे काय? कर्मचारी प्रशिक्षित आहे काय? इ. तपशील पाहणे आवश्यक.

**१८) स्प्रिंकलर सेट :** रु.१५०००/- च्या मर्यादेत स्प्रिंकलर सेट खरेदी शक्य नाही व लाभार्थी रु.१५०००/- पेक्षा अधिकची रक्कम भरणार नाही त्यामुळे प्रस्तुत योजना अमान्य करण्यात येत आहे.

**१९) मत्स्यबीज व्यवसाय :** पुरेशा समर्थनासह प्रस्ताव सादर नाही. या व्यवसायात तांत्रिक बाबी असल्याने स्थानिक पाणीसाठा प्राधिकार, उपलब्ध ग्राहक इ. बाबी विचारात घेवून प्रस्तावित योजनेत सुधारणा करणे आवश्यक आहे.

**२०) पर्यटनस्थळ :** पर्यटनस्थळी हंगामी रोजगारांना चांगला वाव मिळतो. लाभार्थ्यांना तेथे व्यवसायासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने योजना आखण्यात यावी. उदा.ताडोबा, नागझिरा येथे गाईड काम करणा-या युवकांना प्रशिक्षण व साहित्य देणे.

**२१) हातगाडी :** हा व्यवसाय नगरपालिका क्षेत्रापुरता मर्यादित असून त्यास नगरपालिका परवानगी व परवाना क्रमांक आवश्यक आहे.

**२२) सुरक्षा रक्षक प्रशिक्षण :** संस्था शासनमान्य असणे आवश्यक तसेच संस्थेकडून लाभार्थ्यांना नोकरीची हमी घेण्याच्या अटीवर मान्यता देणे.

## ब) मानव संसाधन विकासात्मक योजना : गट क

**१) आदिवासी साहित्य संमेलन भरविणे :**

प्रकल्प कार्यालयांकडून प्राप्त असलेल्या प्रस्तावाचे रुपांतर करुन या योजनेच्या दृष्टीने ३

स्तरीय रचना असावी. १) प्रकल्प स्तर २) प्रादेशिक स्तर ३) राज्य स्तर

A) **प्रकल्प स्तर :** प्रत्येक तालुक्यात किमान १ किंवा २ साहित्य संमेलन भरविणे, त्यात संस्कृती जतन, आदिवासी पारंपारिक नृत्य, सांस्कृतिक कार्यक्रम, आदिवासी वेशभुषा, आदिवासी साहित्य / पुस्तकांचे प्रदर्शन, आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनांची माहिती प्रदर्शन इ. उपक्रम राबवून त्या क्षेत्रातील जास्तीत जास्त लोकांचा सहभाग घेणे तसेच गावपातळीवर इतरांचे सहकार्य घेणे (२४ प्रकल्प)

B) **प्रादेशिक स्तर :** चारही अपर आयुक्त कार्यालयांनी त्यांच्या अंतर्गत प्रदेशातील उपरोक्त निर्देशाप्रमाणे संमेलन आयोजित करणे

C) **राज्यस्तर :** संमेलन नियोजन आयुक्त कार्यालय पातळीवर असेल.

प्रस्तुत योजना राबवितांना साहित्य परिषदेशी चर्चा करुन उपक्रम राबवावा.

**२) शासकीय वसतिगृहांमध्ये दर आठवडयाला माहिती शिबीर आयोजन करणे.**

वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास होण्याच्या दृष्टीने समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, अधिकारी यांचे मार्गदर्शन व वकृत्व शिबीर दर आठवडयाला आयोजन करणे. आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणा-या योजनांचे मार्गदर्शन करणे.

## क) गट ड अंतर्गत दुर्धर आजारांबाबत : 
या लाभार्थ्यांसाठी मुख्यमंत्री जीवनदायी योजना असून योजनेबाबत लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

स्वाक्षरीत/-

स्थळप्रतीवर मा.आयुक्तांची स्वाक्षरी आहे.

आयुक्त, आदिवासी विकास,
महाराष्ट्र राज्य, नाशिक करीता